उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, वर्धा यांचे कार्यालय
प्रशासकिय इमारत, तळमजला, सिव्हील लाईन, वर्धा

**उपजिल्हाधिकारी भूसंपादन विदभर् पाटबंधारे विकास महामंडळ वर्धा यांचे कार्यालयासाठी मासिक भाडेतत्वावर वाहन पुरवठा करण्यासाठी ई — निविदा सुचना**

राष्ट्रीय महामार्ग क्र. 353(I) भूसंपादनाचे कार्यवाहीचे अंमलबजावणीसाठी जिल्हयामधुन विविध दौरे मा.आयुक्त तथा शासनाकडील विविध बैठका तसेच अन्य शासकीय कामासाठी स्कॉरपियो / इन्होवा यापैकी एक वाहन भाडेतत्वावर घेण्यासाठी खाजगी संस्था/व्यक्ती यांचेकडुन ई-निविदा मागविण्यात येत आहे .

1. ई — निविदेचे संक्षिप्त वेळापत्रक खालीलप्रमाणे

| अ.क्र. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| 1 | ई-निविदा प्रसिध्दी दिनांक व वेळ | दि.25/04/2018 सकाळी 11.00 वाजेपासुन |
| 2 | निविदा पूर्व बैठक दिनांक, वेळ व ठिकाण | दि.. 03 /04/2018, सकाळी 11.00 वा., उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) विपाविम कार्यालय, वर्धा. |
| 3 | ऑनलाईन निविदा फॉर्म स्विकृती सुरु दिनांक व वेळ | दि.26/04/2018 दुपारी 3.00 वाजेपासून |
| 4 | ऑनलाईन निविदा फॉर्म स्विकृती अंतिम तारीख व वेळ | दि. 09/05/2018 दुपारी 01.00 वाजेपर्यंत |
| 5 | निविदा उघडणे दिनांक वेळ व ठिकाण (तांत्रिक व दराचा लिफाफा) | दि. 10/05/2018 सांय 4.00 वा. उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) विपाविम कार्यालय, वर्धा. |

**2. <u>निविदा फॉर्म मिळण्याचे ठिकाण</u> - www.wardha.nic.in या संकेतस्थळांवर सदर निविदेची माहिती उपलब्ध आहे. सदर विहीत नमुन्यांमध्येच पुरवठादारांनी आपल्या निविदा ऑनलाईन पध्दतीने सादर कराव्यात.**

**3. निविदा फॉर्म भरण्याची पध्दत व फी** — सदर निविदा या www.wardha.nic.in **संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या आहेत, त्याकरीता सदर संकेतस्थळावरील विहीत कार्यपध्दतीनुसार रु.1000/- फॉर्म फी करीता तसेच रु.10000/- बयाणा रक्कमेकरीता जमा करुन सदर निविदा प्रक्रीयेमध्ये पुरवठादारांना सहभागी होता येईल.**

4. पोष्टाने आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.

5. निविदा हि दोन लिफाफा पध्दतीने सादर करावी लागेल. लिफाफा 'अ' हा तांत्रिक लिफाफा असेल व लिफाफा 'ब' व्यापारी लिफाफा (दराचा) असेल.

6. सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी पुरवठादाराकडे डिजीटल सिग्निचर असणे आवश्यक आहे

7. निविदेबाबतचे अंतिम अधिकार जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडे राखीव ठेवण्यात येत आहे.

क्रमांक/अका/विभूअ/विपाविम/कावि - 274/2018 दिनांक 24/04/2018

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन )
विपाविम, वर्धा.

## उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) विपाविम, वर्धा
### जिल्हा – वर्धा

**ई निविदा प्रक्रियेने मासिक भाडेतत्वावर वाहन घेण्यासाठी प्रस्तावित अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील**

**अटी व शर्ती**

1) निविदा दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करुन सादर करावयाचे आहे. (लिफाफा अ तात्रिक लिफाफा व लिफाफा ब दराचा लिफाफा)
2) लिफाफा अ मधील सर्व बाबीची पूर्तता केली असेल तरच त्या निविदाधारकाचा लिफाफा ब उघडण्यात येईल.
3) निविदेमध्ये प्रत्येक बाबीचा एकच दर व त्यांची माहिती सुस्पष्टपणे नमूद करावी. एकापेक्षा जास्त दर किंवा दर्शविलेल्या दरामध्ये खाडाखोड करु नये. जर निविदेमध्ये माहिती व दरात खाडाखोड केल्यास त्या निविदेचा विचार केला जाणार नाही.
4) निविदाधारकाच्या वतीने निविदेवर स्वाक्षरी करण्यास, निविदे संबधिच्या बैठकांना उपस्थित राहण्यास किंवा तांत्रिक किंवा इतर माहिती पुरविण्यास एखादया व्यक्तीची नियुक्ती केली असल्यास त्यासंबधीचे निविदाधारकाचे प्राधिकार पत्र (biddrtd power of attorney) देणे आवश्यक राहील.
5) निविदाधारकाने निविदा सादर करताना निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती, नियम या व्यतिरिक्त स्वतःची अट निविदेमध्ये समाविष्ट करु नये, अशा पध्दतीच्या सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.
6) निविदा संदर्भात निविदा प्रक्रिये दरम्यान किंवा निविदा स्वीकृती नंतर कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास जिल्हाधिकारी वर्धा यांचा निर्णय अंतिम राहील.
7) निविदाधरकाने निविदा फॉर्म भरतांना अटी व शर्ती यांचे काळजीपूर्वक वाचन करुन तदनंतरच निविदा फॉर्म भरावा अपूर्ण माहिती असलेला निविदा फॉर्म बाद करण्यात येईल. काही अपरीहार्य कारणास्तव खाडाखोड केली असल्यास त्याठिकाणी निविदाधारकाने पूर्ण स्वाक्षरी करावी.
8) निविदा मंजूर करणे अथवा नाकारणे, आवश्यक वाटल्यास अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा किंवा दरासंदर्भात तडजोड (Negotiation) करणेबाबतचे सर्व हक्क जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडेस राखून ठेवणेत आलेले आहेत.
9) बयाणा रक्कम किंवा सुरक्षा अनामत रक्कम यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.
10) अंदाजे दर महा 2000 किमी पर्यत वाहन वापरणेत येईल, त्यानुसार दर नमूद करावा, तसेच 2000 किमी च्या पुढे प्रति किमी दर नमूद करावा. (वाहन चालक व इंधनासह)
11) इंधन / वंगण, वाहन दुरुस्ती व वाहन चालकाचा खर्च (वेतन, भत्ते, प्रवासभत्ते, व इतर योजना) वाहन मालकास दयावे लागेल.
12) वाहनाचा वापर जिल्हयातील ग्रामीण भागात, डोंगराळ भागात, शहरी भागात व बैठकीसाठी जिल्हयाबाहेर केला जाईल.
13) वाहन नादुरुस्त झाल्यास त्या ऐवजी तात्काळ बदली वाहन देण्याची सर्वस्वी जबाबदारी वाहन धारकाची अथवा वाहन मालकाची राहील
14) वाहन मालकाला जर वाहन रदद् करावयाचे असेल तेव्हा जिल्हाधिकारी वर्धा यांचे कार्यालयास एक महिन्याची आगाऊ नोटीस द्यावी लागेल अन्यथा वाहन धारकाकडून अथवा वाहन मालकाकडून एक महिन्याचा भाडेपट्टा दंड स्वरुपात वसूल केला जाईल.
15) यशस्वी निवेदा धारकांने पुरवठा केलेल्या वाहनावर कोणत्याही दिवानी अथवा फौजदारी दावा न्यायालयात दाखल नसावा.
16) लिफाफा अ ( तांत्रिक लिफाफा)

i) वाहनाचे आर.सी. बुक (साक्षंकित प्रत)
ii) वाहनाचा विमा / टॅक्स अद्यावत भरल्याचे कागदपत्रे
iii) वाहन चालकांचा परवाना
iv) पॅन कार्ड छायांकित प्रत

v) पी.यु.सी. प्रमाणपत्र

vi) निविदाधारकास अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे रु. 100/- चे स्टॅम्प पेपरवर नोटरी/ कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र

21) लिफाफा ब (व्यापारी लिफाफा)

i) वाहनाचा 2000 कि.मी. पर्यत मासिक दर वाहनाचे प्रकारानुसार नमूद करावा

22)वाहन केवळ मालकांच्या / चालकाच्या अकार्यक्षमतेमुळे बंद राहिल्यास प्रतिदिनी पडणारे देय भाडे कपात करणेत येईल.

23)करारनामा मुदतीचे आत वाहनाची विक्री किंवा हस्तांतरण करता येणार नाही.

24)वाहन भाडे तत्वावर लावणेत आले नंतर वाहनास कोणताही अपघात झाल्यास होणारे सर्व प्रकारचे जीवीत व आर्थिक नुकसानीस वाहन मालक / चालक स्वतः जबाबदार राहील.

25)वाहन मालकाने लॉगबुक अद्यावत करावे व ते प्रमाणित केल्यानंतर देयक सादर करावे त्याशिवाय मासिक भाडे अदा केले जाणार नाही.

26)कोणतीही निविदा स्वीकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडेस राखून ठेवण्यात येत आहे.

27)यशस्वी अर्जधारकाने कामाचे आदेश प्राप्त होताच 7 दिवसाचे आत वाहन उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील वाहन उपलब्ध करुन न दिल्यास त्यांचे आदेश रद्द करणेत येईल.

28)यशस्वी निविदाधारकांने पुरविलेल्या वाहनाबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकारी मा. जिल्हाधिकारी यांचे कडे राहील.

29)करारनामा मुदतीदरम्यान वाहनांचे संपणारे टॅक्स व विमा अद्यावत करुन देण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील. सदर कागदपत्रे वेळोवेळी पूर्ण करण्यास वाहन मालकाने टाळाटाळ केल्यास होणा-या सर्व कायदेशीर नुकसानीस वाहन मालक सर्वस्वी जबाबदार राहील.

30)यशस्वी वाहन मालकाने पुरवठा केलेल्या वाहनाची मूदत करारनामा करुन दिलेचे दिनांकापासून ते 11 महिण्यापर्यंत पर्यंत राहील.

31)सदर बाबतचे कराराची मुदत कधीही व कोणतेही कारण न दाखविता संपुष्टात आणनेचे किंवा मुदत वाढ देणेचे अधिकार जिल्हाधिकारी यांचे कडे राखून ठेवणेत येत आहेत.

32)निविदा उघडणेच्यावेळी मुळ कागदपत्रे व सदर कागदपत्राचा एक झेरॉक्स संच सोबत आणावा.

33)निविदा मंजूरी नंतर अनामत रक्कम रु. 10000/- उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) विपाविम,वर्धा यांचे नावे धनाकर्ष जमा करावा लागेल अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

34)वरील 1 ते 33 अटी पूर्ण करणा-या व कमी दरामध्ये वाहन उपलब्ध करुन देणा-या निविदाधारकास प्राधान्य देणेत येईल.

दिनांक- 24 / 04 /2018 — निविदाधारकांची स्वाक्षरी

ठिकाण- वर्धा — (नाव [illegible] )